★★★★★ B+
Accredited by NAAC

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ४५ वा वार्षिक दीक्षान्त समारंभ

शुक्रवार, दि. २७ फेब्रुवारी, २००९

## प्रा. डॉ. एम. एम. साळुंखे

कुलगुरू
शिवाजी विद्यापीठ

यांनी सादर केलेला अहवाल





## प्रा. डॉ. एम. एम. साळुंखे

कुलगुरू
शिवाजी विद्यापीठ

# ४५ वा दीक्षान्त समारंभ

## प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे,

कुलगुरू,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

यांनी सादर केलेला अहवाल

आजच्या पदवी प्रदान समारंभाच्या प्रमुख पाहुण्या मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरु डॉ. श्रीमती स्नेहलता देशमुख, विद्याशाखांचे अधिष्ठाता, अधिसभा व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, नूतन पदवीधर, इतर विद्यार्थी, उपस्थित मान्यवर, माध्यमांचे प्रतिनिधी आणि मित्रहो,

आरंभीच, ४५ व्या दीक्षान्त समारंभात पदवी, पदविका प्राप्त केलेल्या सर्व स्नातकांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो व त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा देतो. ४५ व्या दीक्षान्त समारंभात विद्यापीठाच्या वर्षभरातील महत्वपूर्ण घडामोडींचा अहवाल सादर करताना मी मनोमन समाधानी आहे.

विद्यापीठाने अल्पावधीत केलेली प्रगती आणि विकास दर्शविणारा हा अहवाल सादर करताना मला आनंद आणि समाधान होत आहे.

जागतिकीकरणाच्या आव्हानांना तोंड देताना आपला विद्यार्थी कुठेही कमी पडू नये या ध्येयधोरणाने सुरू करण्यात आलेल्या अनेक अभ्यासक्रमांना चांगले रूप प्राप्त झालेले असून उत्तरोत्तर अनेक नवनवे उपक्रम राबविण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. नुकतीच विद्यापीठाच्या पुनर्मूल्यांकनासाठी नॅक समितीने भेट दिली. त्यापूर्वी विद्यापीठाने अकराव्या पंचवार्षिक योजनेसाठी जो विकास प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर केला होता त्यासंदर्भात पाहणी करण्यासाठी आयोगाच्या समितीने विद्यापीठास भेट दिली. दोन्ही समित्यांनी विविध अधिविभागांना व इतर विभागांना भेटी दिल्या आणि विद्यापीठाच्या कार्यप्रणालीबद्दल व प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. नॅककडून चांगले मानांकन आणि अकराव्या पंचवार्षिक योजनेत विद्यापीठास भरघोस असे अनुदान मिळेल अशी आशा आहे. यापैकी रूपये सात कोटींचे अनुदान प्राप्त झालेलेच आहे. विद्यापीठाच्या वर्षभरातील काही ठळक उपक्रमांचे व वाटचालीचे प्रतिबिंब आपणांस या अहवालात पहावयास मिळेल.

याही वर्षी विद्यापीठाने विविध राष्ट्रीय- आंतरराष्ट्रीय संस्थांशी, विद्यापीठांशी सामंजस्य कराराची परंपरा निरंतर चालू ठेवली आहे. यावर्षी Ontario University, Canada, Chennam National University, South Korea, National Institute of Space Research, Brazil, Gifu University, Japan, University of Brazilia Foundation, Brazil, National Institute of Oceanography, Goa यांच्याशी अध्यापन आणि संशोधन कार्यासाठी सामंजस्य करार झाले आहेत. चेन्नईच्या सी. एल. आर. आय. या चर्मोद्योगाशी संबंधित झालेल्या करारानुसार विद्यापीठात या क्षेत्रातील कारागीरांच्या प्रशिक्षणाचा मोठा प्रकल्प उभा राहतो आहे. अध्यापन कार्य, संशोधन व परिषदा तसेच चर्चासत्राच्या निमित्ताने उभय संस्थांमध्ये शैक्षणिक आदान प्रदान वर्षभरात मोठया प्रमाणात होत आहे.

## विद्यार्थी केंद्रीत दृष्टी

विद्यापीठ स्थापनेपासून विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विद्यापीठाची यशस्वी वाटचाल सुरू आहे. आर्थिकदृष्टया वंचित सामाजिक स्तरातील विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असणा-या डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन अंतर्गत 'कमवा व शिका' योजनेत या वर्षी १४२ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. विद्यार्थी भवनमधील अनेक भौतिक सुविधा अधिक वाढविल्या आहेत. इमारतीचे विस्तारीकरण झाले असून विद्यार्थी संख्येतही लक्षणीय वाढ झाली आहे. तसेच या योजनेत विद्यार्थीनींचाही मोठ्या प्रमाणात समावेश करण्यात आला आहे. गतवर्षात विद्यार्थी भवनच्या माजी विद्यार्थ्यांनी डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन प्रबोधिनी स्थापन केली आहे. याशिवाय एक खास 'मागेल त्याला काम' ही श्रमकौशल्यांचे मूल्य रुजविणारी योजना सुरु केली आहे. यामध्ये गतवर्षी ८५० इतके विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या वर्षीचा नवा उपक्रम म्हणजे वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थीनींना प्रथमत:च ५०० सायकलींचे वितरण करण्यात आले. पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यास याप्रकारचे उपक्रम उपयुक्त ठरणार आहेत.

## शिष्यवृत्ती

शिवाजी विद्यापीठ गुणवान तसेच आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्त्या प्रदान करते. यावर्षीच्या शिष्यवृत्तीचे वैशिष्ट्य म्हणजे अपंग, निराधार, आणि क्रीडा नैपुण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष शिष्यवृत्तींचा गट नव्याने देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. सामाजिक दृष्टया वंचित स्तरातील विद्यार्थ्यांना याचा मोठा उपयोग होणार आहे. यावर्षी विद्यापीठाने एकूण सुमारे रु. १८ लाखाच्या ४१४ शिष्यवृत्त्या प्रदान केल्या आहेत. यावर्षी विविध देणगीदाराकडून चौदा लाख रूपयांची रक्कम शिष्यवृत्तीसाठी मिळाली आहे.

## विद्यापीठ परिसर/सुसज्जता आणि सुशोभिकरण

विद्यापीठ परिसरामध्ये शिक्षण व संशोधनाचा उच्च दर्जा राखण्यासाठी उत्तम प्रकारच्या सुविधा प्राप्त करून दिल्या जात आहेत. यावर्षीही अनेक नव्या इमारतींचे बांधकाम पूर्णत्वास आले. परीक्षा, विस्तारित परीक्षा भवन, तंत्रज्ञान विभागाची इमारत, विद्यार्थिनी वसतिगृह या इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले. संगीत व नाटयशास्त्र विभागाच्या इमारतीचे नूतनीकरण व अद्ययावत अशा स्टुडिओचे उदघाटन केंद्रीय ऊर्जामंत्री मा. सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते नुकतेच झाले. तर वि.स. खांडेकर भाषा भवन येथे बांधलेल्या भव्य अशा सभागृहाचे उदघाटन केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य मा. भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते झाले. तसेच दीक्षान्त समारंभासाठी व अन्य कार्यक्रमांसाठी भव्य आणि देखण्या लोककला सभागृहाची उभारणी करण्यात आली आहे. ग्रंथालयात डिजिटायझेशनचे आणि पुस्तकांच्या संगणकीकरणाचे काम पूर्ण झाले. विविध ठिकाणी लॅण्डस्केपींगची, बागांची व फूटपाथची विविध कामेही पूर्णत्वास आली आहेत. विद्यापीठ परिसरात संलग्न महाविद्यालयांच्या सहयोगाने त्यांच्या नावाने वृक्षारोपण करण्यात आले आहे.

## अध्यासन आणि अभ्यास केंद्रे

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहाय्याने यापूर्वी चार अभ्यास केंद्रे सुरू करण्यात आलेली आहेत. यावर्षी पं. जवाहरलाल नेहरू केंद्रास मान्यता मिळून ते कार्यरतही झाले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या मदतीने पुढारीकार डॉ. ग. गो. जाधव अध्यासन लवकरच स्थापन होण्याची अपेक्षा आहे. विद्यापीठातील सर्व अध्यासने व अभ्यास केंद्रे जोमाने काम करत असून त्यांनी अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत.

## अध्यापन, संशोधन व विस्तार कार्य

मला सांगायला आनंद होतो की, विद्यापीठाने पारंपरिक अभ्यासक्रमापेक्षा काही व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम कार्यान्वित केले आहेत. गतवर्षी विद्यापीठाने बी. टेक., एम. एस. डब्ल्यू, एम. बी. ए. Distance/Executive, मास्टर इन व्हॅल्युएशन, एम. पी. ए., (ड्रॅमॅटिक्स) एम. ए. रशियन असे नवे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. विद्यापीठात शैक्षणिक लवचिकतेच्या धोरणानुसार 'सत्र पद्धती', 'क्रेडिट सिस्टिम अंतर्गत मूल्यमापन' या मूल्यमापन पद्धती लागू केल्या आहेत. या ठिकाणी मला नमूद करायला आनंद होत आहे की, गेल्या काही वर्षात विद्यापीठातील अधिविभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये दुपटीने वाढ झाली आहे. बदलत्या अभ्यासक्रमांचे स्वरूप व विस्तार ध्यानात घेवून ही प्रवेश क्षमता वाढली आहे. संशोधनास चालना देण्यासाठी अविष्कार या राज्यस्तरीय संशोधनपर उपक्रमात विद्यापीठाचे

विद्यार्थी सहभागी झाले व त्यांनी यश संपादन केले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने पाच अधिविभागांना विशेष संशोधन केंद्रे सॅपत्र म्हणून मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे फिस्टखाली (FIST) सहा व असिस्ट (ASSIST) खाली एक व सॅप नसलेल्या सहा अधिविभागांना खास संशोधन सहाय्य प्राप्त झाले आहे. गेल्या काही वर्षात विद्यापीठास मिळणाऱ्या संशोधनपर अनुदानात मोठी वाढ झाली आहे. गतवर्षात चार कोटी एवढी रक्कम मिळाली. तर रू. दोन कोटी एकोणसत्तर लाख इतकी रक्कम संशोधन प्रकल्पांसाठी प्राप्त झाली.

## अनुदान

गतवर्षात विद्यापीठातील विविध अधिविभागात व संलग्रित महाविद्यालयात बृहत संशोधन प्रकल्प (Major Research Project) व लघु संशोधन प्रकल्प यामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. यावर्षी ०८ इतके मेजर रिसर्च प्रोजेक्ट व ३४ मायनर रिसर्च प्रोजेक्ट प्राप्त झाले आहेत. वनस्पतीशास्त्र अधिविभागास 'लीडगार्डन' म्हणून बृहद संशोधन प्रकल्प प्राप्त झाला आहे.

या वर्षापासून विद्यापीठाने व्यावसायिक क्षेत्रातील तज्ञांच्या ज्ञानाचा, अनुभवाचा फायदा विद्यार्थ्यांना मिळावा म्हणून 'अॅडजंक्ट प्रोफेसर' या पदाची निर्मिती केली आहे. अनेक अधिविभागांत या पदासाठी सन्माननीय व्यक्तींची नेमणूक केली आहे. तसेच अधिविभागांत थोर व्यक्तींच्या नावाने अध्यासने निर्माण करून त्यावर चेअर प्रोफेसरची नियुक्ती करण्याची योजना मान्य केली आहे.

## चर्चासत्रे, व्याख्यानमाला व कार्यशाळा

विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांत गतवर्षात २० व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात आले. तसेच गेल्या वर्षभरात विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांचे, परिषदांचे आयोजन केले आहे. या चर्चासत्रांचे एक वेगळेपण म्हणजे समाजोपयोगी अशा महत्वपूर्ण विषयांवर जाणीवपूर्वक चर्चासत्रे घडवून आणली आहेत. त्यामध्ये नामवंत तज्ञांनी/अभ्यासकांनी सहभाग घेतला आहे. पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र विभागाने International Conference on Nanomaterials and Applications (ICNAMA-2008) या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले. सामाजिक वंचितता व समावेशक धोरण या अभ्यास केंद्राच्या वतीने Social Exclusion and Inclusive Policies in South Asia या विषयावरील आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले. तर प्रौढ व निरंतर शिक्षण विभागाच्या वतीने ५७ व्या अखिल भारतीय परिषदेचे आयोजन केले होते. इतिहास व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने '१८५७ चा

पश्चिम भारतातील उठाव' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्राच्या वतीने 'समकालीन दलित साहित्य' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. सामाजिक वंचितता व समावेशक धोरण केंद्राच्या वतीने 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' या महत्वपूर्ण विषयावर चर्चासत्र आयोजित केले होते. बहुशाखीय अभ्यास केंद्राच्या वतीने Cultures in Transition या विषयावर राष्ट्रीय चर्चसत्र आयोजित केले. इतरही अनेक महत्वपूर्ण चर्चासत्रे, कार्यशाळा विद्यापीठात व संलग्न महाविद्यालयात संपन्न झाल्या.

## अनुदान

विद्यापीठ संशोधन व विस्तार कार्यासाठी वर्षभरात विविध माध्यमातून भरघोस अशा प्रकारचे अनुदान प्राप्त झाले आहे. मला सांगायला आनंद होतो की, विद्यापीठ अनुदान आयोग व इतर वित्तीय संस्थांकडून विविध प्रकल्पांतर्गत गतवर्षी सुमारे रु. ५ कोटी इतके अनुदान मंजूर झाले. या अनुदानात दहापटीने वाढ झाली आहे.

तसेच फिस्ट योजनेअंतर्गत विभागाच्या विकासासाठी व संशोधनासाठी भरघोस अनुदान प्राप्त झाले. शिवाय अकराव्या पंचवार्षिक योजनेमधूनही जवळ जवळ तीन कोटी रुपयाचे अनुदान मंजूर झाले आहे.

## कॅम्पस इंटरव्हयू

विद्यापीठातील 'प्लेसमेंट सेल' हा अधिक सक्रिय आहे. गतवर्षात विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी प्राप्त व्हाव्यात म्हणून प्लेसमेंट सेलच्या वतीने विविध कॅम्पस इंटरव्हयूंचे आयोजन करण्यात आले. यासाठी निकोलस पिरामल इंडिया (NIPL) व टाटा एंटरप्राईझ लि. या नामवंत कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची निवड झाली. काही अधिविभागाचे प्लेसमेंट सेलचे प्रमाण हे ६० ते १०० टक्के आहे. इन्फोसिस, म्हैसूर या संस्थेच्या सामंजस्य करारानुसार विद्यापीठातील ५००० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यातील अनेक विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.

## ग्रंथमहोत्सव २००९

शिवाजी विद्यापीठ दरवर्षी वाचन संस्कृतीची वृध्दी व्हावी म्हणून आगळ्यावेगळ्या अशा ग्रंथमहोत्सवाचे आयोजन करते. याही वर्षी या ग्रंथमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने जागतिक मराठी अकादमीच्या सहकार्याने 'शोध मराठी मनाचा २००९' या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनात विविध चर्चासत्रे, प्रकट मुलाखती,

कविसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अनेक परदेशस्थ मराठी उद्योगपती, नामवंत तंत्रज्ञ या संमेलनास उपस्थित होते. विद्यार्थी वर्गाचा या संमेलनास भरभरून प्रतिसाद लाभला. तरूण वर्गातील उद्यमशीलता तसेच व्यावसायिक कौशल्याची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी याद्दृष्टीने हे संमेलन फलदायी ठरले. या परदेशस्थ उद्योगपतींच्या रंगलेल्या प्रकट मुलाखतीतून त्यांचा जीवनपट उलगडला.

## राष्ट्रीय सेवा योजना

गतवर्षात कोल्हापूर जिल्हा हा देशपातळीवर १०० टक्के निर्मलग्राम जाहीर झाला. मला सांगायला आनंद होतो की, यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा मोठा सहभाग होता. विविध शिबीरे घेऊन जवळपास ४००० विद्यार्थ्यांना याबाबतचे प्रशिक्षण दिले होते व या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांकडून शिवाजी विद्यापीठाने विकसित केलेल्या निर्मलग्राम बाबतच्या प्रतिमानाचा राज्य शासनाने आदर्श प्रतिमान म्हणून स्वीकार केला आहे. सांगली जिल्हयातील एक लाख तीस हजार कुटुंबाचे सामाजिक आणि आर्थिक सर्वेक्षण केले. यामध्ये एन.एस.एस.ने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दूरशिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांची वाढ होण्यातही एन.एस.एस. ने महत्त्वाचे योगदान आहे.

## विद्यार्थी कल्याण विभाग

मला सांगायला आनंद होतो की, विद्यापीठात प्रथमत:च या वर्षी 'शिवोत्कर्ष' या राष्ट्रीय स्तरावरील युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. देशातील विविध ६१ विद्यापीठांचे संघ यात सहभागी झाले होते. भारतभरातील तरूणाईंचा कलाविष्कार यानिमित्ताने पहायला मिळाला. तसेच पश्चिम विभागीय युवा महोत्सव, इंद्रधनुष्य या राज्यस्तरीय युवा महोत्सवात विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी वैयक्तिक व सांघिक प्रकारात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यावर्षी तीन विभागीय युवा महोत्सव तसेच राजर्षि शाहू आर्टस अँड कॉमर्स कॉलेज, रूकडी येथे मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

## क्रीडा विभाग

क्रीडा विभागामार्फत यावर्षी प्रथमत:च अखिल भारतीय आंतर विद्यापीठ हॅण्डबॉल स्पर्धेचे आयोजन केले. मला सांगायला अभिमान वाटतो की, यावर्षी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाने विविध स्पर्धामध्ये नेत्रपदीक यश मिळविले आहे. विविध क्रीडा प्रकारांमधून राष्ट्रीय स्तरावर २३ सुवर्णपदके, ४ रौप्यपदके आणि ६ कास्यपदके मिळविले आहेत. शूटिंग या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय स्तरावर सर्वसाधारण विजेते पदाचा चषक पटकविला आहे. 'अश्वमेध' या स्पर्धेत एकूण ६ सुवर्णपदकांसह १६ पदके प्राप्त केली आहेत. या कामगिरी बरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावर बिजिंग ऑलिम्पिक, राष्ट्रकूल स्पर्धामधून विद्यापीठाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय यश

संपादन केले आहे. राही सरनोबत, तेजस्वीनी सावंत, नवनाथ फरताडे, स्नेहांकिता वरूटे व राधिका बराले हे खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकले.

### दूरशिक्षण केंद्र

विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राने अल्पावधीतच लक्षणीय कामगिरी केली आहे. बहि:स्थ विद्यार्थ्यांसाठी या केंद्राने स्वयंअध्ययन पुस्तिकांच्या SIM निर्मितीत मोठी वाढ केली आहे. या विभागामार्फत अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमही कार्यान्वित झाले आहेत. यावर्षी दूरशिक्षण विभागांच्या नवीन संशोधन विकासासाठी लघुसंशोधन प्रकल्पांसाठी दोन लाख रूपये अनुदान विविध अभ्यासकांना देण्यात आले. या केंद्राची सुसज्ञ इमारत लवकरच आकाराला येत आहे.

### प्रशासकीय सुधारणा

गतवर्षी विद्यापीठातील प्रशासकीय सुधारणा मोठया प्रमाणात झाली आहे. बहुसंख्य कार्यालयांचे नूतनीकरण करण्यात आले आहे. लेखा विभागाच्या कामकाजात सुसुत्रता व गतिमानता आणण्यासाठी तयार केलेल्या लेखा संहिता (Account Code) या बदलाची अनेकांनी दखल घेतली आहे. स्वच्छता अभियान योजनेअंतर्गत अधिविभाग व प्रशासकीय विभाग व परिसराची पाहणी तज्ज्ञ समितीमार्फत करण्यात आली. विद्यापीठाची माहिती व वाटचाल सर्वदूर पोहाचण्यासाठी शिवसंदेश हे ई–जर्नल संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त गुणवंत शिक्षक व गुणवंत कर्मचारी व यश संपादन केलेल्या पाल्यांना गौरविण्यात आले.

## प्रमुख पाहुण्यांचा परिचय

आजच्या या समारंभास ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, माजी कुलगुरू व वैद्यकीय क्षेत्रात ज्यांनी मौलिक स्वरूपाचे काम केले आहे अशा डॉ. स्नेहलता देशमुख या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या आहेत. याप्रसंगी त्यांचे स्वागत करताना मला अत्यानंद होत आहे. डॉ. स्नेहलता देशमुख यांनी मुंबईच्या प्रख्यात एल.टी.एम. वैद्यकीय महाविद्यालयात अध्यापनाचे काम केले आहे. तसेच त्यांनी मुंबईच्या एल.टी. एम.जी. हॉस्पिटलच्या अधिष्ठाता व बालरोगतज्ज्ञ म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील त्यांचे संशोधन व लेखन हे स्पृहणीय असेच आहे. या विषयावरील जवळपास त्यांची आठ पुस्तके प्रकाशित आहेत. सर्वसामान्य लोकांमध्ये आरोग्य जागृतीचे महत्व त्यांनी सातत्याने प्रतिपादन केले. त्या सातत्याने समाज प्रबोधनाच्या कार्यात व्यग्र असतात. मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू म्हणून त्यांनी आपल्या कार्यशैलीचा शिक्षणक्षेत्रात वेगळा असा ठसा उमटविला आहे.

त्यांच्या वैद्यक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना अनेक सन्मान प्राप्त झाले आहेत. रॉयल कॉलेज ऑफ सर्जन ही सन्माननीय फेलोशिप, मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाचा डॉ. बी.सी. रॉय पुरस्कार, डॉ. बी.एन. पुरंदरे पुरस्कार हे त्यापैकी कांही होत. मला याठिकाणी सांगायला आनंद होतो की, लखनौच्या श्री शाहूजी महाराज मेडिकल विद्यापीठाने नुकतीच त्यांना सन्माननीय डॉक्टर ऑफ सायन्स या पदवीने सन्मानित केले आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या दीक्षांत समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून येण्यास स्वीकृती दिली याबद्दल मी कृतज्ञ आहे. त्यांच्या दीक्षांत भाषणातून आपणा सर्वांना नावीन्यपूर्ण मार्गदर्शन मिळेल असा मला विश्वास वाटतो.

मित्रहो! पुन्हा एकदा आपणा सर्वांचे मन:पूर्वक स्वागत करून मी माझे अहवालवाचन पूर्ण करतो आणि आजच्या दीक्षान्त समारंभाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. स्नेहलता देशमुख यांना विनंती करतो की, त्यांनी आपले दीक्षांत भाषण करावे.

■ ■ ■

# 45$^{th}$ Convocation of Shivaji University

## Vice-Chancellor's Report

Hon'ble Chief Guest of 45$^{th}$ Convocation of Shivaji University, Dr. Snehalata Deshmukh, Former Vice-Chancellor of University of Mumbai, Deans of various faculties, Hon. Members of Academic and Management Council, Young graduates, others students, dignitaries present, media persons and dear friends,

At the outset let me congratulate all graduates upon whom the degrees have been conferred today and wish them all success in their future career. I stand before you to present the report of various activities conducted in the university during the last academic year.

It's a matter of pride and pleasure to present this brief report of the activities undertake during the last year which indicate the progress and development of the university during the short span of time.

To prepare the students to face the challenges of the era of globalization, we have taken a concrete step and we have been successful in implementing various novel programs. Very recently the NAAC Peer Team visited the university for the purpose of re-accreditation. Similarly, the UGC 11$^{TH}$ Plan committee also visited the university to assess the developmental proposal sent to the UGC. Both the committees visited all departments and centers of the University and expressed their satisfaction with the working and the progress of the university. We expect good grade from NAAC and seven substantial grants from the UGC during the 11$^{th}$ Plan period. We have already received a grant of Rs. 7 crores under the Plan.

I want to convey you major achievements of the university in the various programs and activities undertaken. We have continued the

practice of entering into MOUs with International Institutes and Universities. The MOUs signed this year for the purpose of Teaching and Research include *Ontario University* (Canada), *Chennam National University* (S. Korea), *National Institute of Space Research* (Brazil), *Gifu University* (Japan), *University of Brasilia Foundation* (Brazil) as well as National Institute of Oceanography (Goa). A Training Project for craftsmen in Leather Industry is being materialized as per the MoU with C.L.R.I., Chennai in the university. Both the Institutes are having a lot of academic interaction in terms of training, research, conferences and seminar-workshops.

**Student Centered Vision**

Since its inception, University is progressing keeping the student community at the focus. One of the Inclusive Policy of the University for the Excluded is the Earn and Learn Scheme conducted under the auspices of Dr Appasaheb Pawar Vidyarthi Bhavan. This scheme could accommodate 142 students from the economically weak strata of the society. We could add new facilities to the Infrastructure of the Bhavan. An Extension of the Building has been completed and the student strength accommodated therein has been increased considerably. This scheme now accommodates the girl students on the large scale. The alumni of Bhavan have started *Appasaheb Pawar Vidyarthi Bhavan Prabodhini.* We have started unique scheme of Work on Demand. This scheme aims at inculcation of dignity of labour among the students. More than 850 PG students have participated in this scheme. Five hundred bicycles have been allotted to the resident students of the Girls and the Boys hostels for the first time to help them manage their precious time on the campus. We hope, against the backdrop of global warming, this step would also kindle Environmental awareness in them.

**Scholarships**

Shivaji University offers many scholarships to the meritorious and economically weaker students. This year we have added a new class

of scholarships for the handicapped and the orphan as well as for those excelling in sports. A large number of students from the excluded strata will benefit from this addition. In all 414 scholarships were given by the university this year including four new. University has received an amount of Rs. 14 Lacks from various generous donors to institute the scholarships and prizes.

**The University Campus**

Many infrastructural facilities are being made available on the University Campus to maintain the high standards in Quality of Education and Research. Many new buildings were completed in the current year including the New Examination Building, extension of Exam Bhavan, Building for International Institute of Technology, a new building of Ladies Hostel. The renovated building of Department of Music, Performing and Fine Arts and state-of-the art Studio was recently inaugurated at the auspicious hands of Hon. Shri Sushilkumar Shinde, Minister of Power, Government of India. The state of art Auditorium at V S Khandekar Bhasha Bhavan was inaugurated at the auspicious hands of Hon. Dr. Bhalchandra Mungekar, Member of Planning Commission. Another magnificent and beautiful structure is the Lok Kala Auditorium to be used for Convocation and other programs and mega events. I am happy that this the 1st Convocation Function in this hall. Computerization and digitization of Library system at Br Balasaheb Khardekar Library has been completed. The campus has taken a face lift on beautification and completion of landscaping, gardens and footpaths at various places. Trees have been planted on roadside with the campus in collaboration with the affiliated colleges, every college has donated a tree with a tree-guard.

**Chairs and Centers of Study**

Earlier, four centers of study have been started with the assistance from UGC. This year, the Nehru Centre has been recognized and is already functional. We hope that chair in the name of Pudhari-kar Dr G. G. Jadhav will be established soon with the assistance from Govt

of Maharashtra. All chairs and Centers of Study on the university campus are actively engaged in the research and extention activities and they have published various books.

**Teaching, Research and Extension Activities**

I am glad to state that the university has started a number of professional courses other than the traditional ones. The courses launched during the last year include B. Tech., M. S. W., M. B. A. Distance/Executive, Master in Valuation, M. P. A., Dramatics, and M. A. (Russian). Under Academic flexibility university has introduced semester system, credit system and internal evaluation system. I am again happy to state that the number of students in the various departments on the campus has doubled. The rise in the intake capacity is the result of changing nature of the courses offered. The students from this university have been participating in the state-level research activity called *Aavishkar* and have won laurels therein.

Five departments on the campus have been recognized by UGC under its Special Assistance Program (SAP). Six departments come under FIST and one under ASSIST. In addition, six of the non-SAP departments have received special research assistance. There has been a substantial increase in the research grants received by the university during the last few years. Amount of grant received was Rs. 4 crores during the last year. University has received the grant of Rs. 2.69 crores for various Research Projects. The number of major and minor research projects sanctioned in the various departments and in the affiliated colleges has substantially increased during the last year. The number of Major Research Projects sanctioned is 08 and that of Minor Research Project is 34. The Department of Botany has been sanctioned very important Research Project as a Lead Garden.

The university has created a post called *Adjunct Professor* in order that the students have a benefit of the knowledge, expertise and experience of various experts in the professional fields. Many

departments have invited experts on these posts. The university has also approved a scheme of establishing chairs in the name of renowned persons and appointing Chair professors.

**Seminars, Workshops and Lecture series**

Univerity has organized 20 lectures on very vital issues in various areas under the lecture series. A number of various National and International Seminars and Conferences were organized during the last year. A notable characteristic of these is that most of them were focused on socially relevant issues. A number of renowned scholars participated in these seminars and workshops. The Departments of Physics and Chemistry have jointly organized an International Conference on Nanomaterials and Applications (ICNAMA-2008). The Center for Social Exclusion and Inclusive Policies organized an *International Seminar on Social Exclusion and Inclusive Policies in South Asia*. The Department of Adult and Contining organized 57$^{th}$ National Conference. Department of History and Political Science conducted a National Seminar on *The 1857 Uprising in Western India*. *Contemporary Dalit Literature* was the theme of National Seminar organized by Center of Dr Babasaheb Ambedkar Studies. The Center for Social Exclusion and Inclusive Policies organized a seminar on *Farmers' Suicides*. Centre for Multidisciplinary Studies came up with a National Seminar on *Cultures in Transition*. Many more important seminars and workshops were held in the university and affiliated colleges.

**Grants**

The university has received substantial grants for Research and Extension Activities from various sources. I am happy to state that various projects have received nearabout a grant of Rs. 5 crores (Five Crores) during the last year. This is a ten-fold increase. Under FIST, grants have been received for development and research in the department(s). In addition, grants upto Rs.3 crores have been received under the 11$^{th}$ plan.

### Campus Interviews

The Placement Cell in the university is quite active. It organized campus interviews in various departments to prepare the students to get better career opportunities. Nicholas Piramal India Limited (NIPL) and Tata Enterprise Ltd. are some of the renowned companies that have picked up students from the campus. The percentage of placements achieved by certain departments ranges from 60 to 100 percent. Five thousand students were trained under an MOU between the university and INFOSYS, Mysore. Many of them have been absorbed in various companies.

### Granth Mahotsav 2009

Shivaji University organizes a book festival i.e. Granth Mahotsav every year in order to promote 'Reading Culture'. This year it was on the occasion of a gathering of *Jagtik Marathis Academy*, the theme was *Shodh Marathi Manacha 2009*. This gathering included various sessions, interviews of very successful Marathi entrepreneurs in the country and from abroad, poetry reading sessions, and other cultural programs. Many Marathi industrialists and eminent technocrats from abroad attended this function. The event was undertaken with the aim to germinate a liking for entrepreneurship and professional skills, it was a huge success in terms of the number of students that attended it. The interface with the entrepreneurs abroad gave glimpses of their success stories.

### National Service Scheme

Kolhapur district was declared hundred percent Nirmal Gram District last year at the National level. I humbly claim that a lion's share of this success goes to NSS of Shivaji University. Nearly four thousand students were trained in this regard during various camps. The Nirmal Gram model developed by Shivaji University through these trained students has been accepted as the ideal model by the State Government. The NSS has carried out a social and economic survey of nearly 1.3 lack families in the Sangli district. NSS has also played important role in increasing the enrolment in distance education courses.

**Director Students Welfare**

I am pleased to state that for the first time in the history of this university, *Shivotkarsh*, a National Youth Festival was organized this year. Teams of the student performers from Sixty-One universities across the country participated in the festival. The participants from all over the country exhibited their artistic talent in various performing arts. Our students have won medals and prizes at the West Zone Festival as well as at *Indradhanushya* the state level Youth Festival.

This year three district level Youth Festivals were organized and the Central Festival was organized at Rajarshi Shahu College, Rukadi.

Shivaji University Campus Film society has been formed in order to inculcate a taste for classic and artistic films produced across the globe.

**Sports**

For the first time, All India Inter University Hand Ball Competitions were organized by the Sports Department. I am happy to report that Shivaji University was the National Champions in these competitions. Sports departments has achieved many prizes in various events in this year. At national level university teams have won 23 gold medals, 4 Silver medals and 6 bronze medals and General Championship in Shooting is also at credit. In the 'Ashwamedh Tournament' university players have bagged 16 medals with 6 gold medals. It is a matter of honour that, our students have won medals at Beijing Olympics and in Commonwealth games. They include Rahi Sarnobat, Tejaswini Sawant, Navnath Fartade, Snehankita Varute and Radhika Barale.

**Distance Education Center**

The Distance Education Center has covered a lot of distance during a short span of time. It has developed Self Instructional Material for the Distance Mode students resulting in substantial growth in production of self-study books. This Center has launched new professional courses, I have already mentioned those. The Center has

decided to give the grant of 2 lacks for minor projects for research and development in the field of distance education. A new well-equipped building for the center will soon come up.

**Administrative Reforms**

The university has introduced a number of administrative reforms during the last year. Many offices have been renovated. The Account Code developed to bring about coordination and speed in the Accounts section has been appreciated by the experts in the field. The Teaching Departments and Sections in the Administration buildings were inspected by the experts under the scheme of *Swachhata Abhiyaan*. The e-journal titled *Shivasandesh* is periodically published on the university web-site so that the information and progress of the university reaches the society. The meritorious teachers, meritorious staff and wards of the university employees were felicitated on the occasion of University foundation day. It is our regular healthy practice.

Thank you !

■ ■ ■



प्रकाशक : प्र. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४.

मुद्रक : अधीक्षक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४